इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

वाहन विभाग,

जा.क्र.वाहन/२४०/२०२५

दि. २९/०७/२०२५

# सर्क्युलर

इचलकरंजी महानगरपालिकेच्या सर्व नोंदणीकृत मक्तेदार व संस्था नोंदणी प्रमाणपत्र पुरवठाधारक यांना कळविणेत येते की, इचलकरंजी महानगरपालिकेकरिता गणेशोत्सव काळात विसर्जित केलेल्या गणेश मूर्तींची तसेच निर्माल्यांची वाहतूक करणेकामी १२ टन टिपर ( तत्सम ) व ट्रॅक्टर-ट्रॉली प्रकारातील वाहने इंधनासह भाडेतत्वावर पुरविणे कामाचे अंदाजपत्रक तयार करणेबाबतच्या कोटेशन दरासंबंधी मा. अति. आयुक्त यांचे दि.२८/०७/२०२५ अन्वये महानगरपालिका वेबसाईटवरून तसेच नोटीस बोर्डावर प्रसिद्धी देऊन दरपत्रक / कोटेशन मागविणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचे काम आपण किती व कोणत्या दराने करणेस तयार आहात याबाबतचे सोबत जोडले तक्त्याखाली नमूद केले सूचनेप्रमाणे आपले दरपत्रक / कोटेशन खालील अटीस अधीन राहुन देणेचे आहे.

१. प्रस्तुतकामी महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या नमुन्यात दर देणेत यावेत.
२. वाहने भाडेतत्वावर पुरवठा करावयाचे दर सर्व टॅक्ससह असली पाहिजे किंवा त्याबाबत तसा स्पष्ट खुलासा असला पाहिजे.
३. प्रस्तुतकामी बाजारातून आलेले दर हे फक्त अंदाजपत्रक तयार करणेस तसेच अंदाजपत्रकिय तरतूद निश्चित करणेसाठी मर्यादित राहतील.
४. आलेले दरपत्रक / कोटेशन पैकी कोणताही कमीचा अगर जास्तीचा मंजूर अगर नामंजूर करणेचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे. त्याची कोणतीही कारणे दिली जाणार नाही.
५. सदर कामाची पूर्तता महानगरपालिकेचे सुचनेप्रमाणे करणे बंधनकारक राहील.
६. कामासंबंधी अधिक माहिती वाहन विभागाकडे मिळेल.

तरी सदरचे सर्क्युलर मधील सोबत जोडले तक्त्यानुसार दर नमूद करून सिलबंद दरपत्रक / कोटेशन दि.३०/०७/२०२५ ते दि.०१/०८/२०२५ अखेर सांय.०४:०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या बारनिशी विभागाकडे देणेची आहेत. प्राप्त सिलबंद दरपत्रक / कोटेशन शक्यतो दि.०१/०८/२०२५ रोजी सकाळी ०५:०० वाजता उघडणेत येतील त्यावेळी संबंधीतांनी समक्ष हजर रहावे.

नितीन बनगे

वाहन अधिक्षक

---

| अ. क्र. | मक्तेदार नाव | सही |
|---|---|---|
| 1) | | |
| 2) | | |
| 3) | | |

**प्रत नोटीस बोर्डावर लावणे कामी.**

टिप :-

१) सदरचे सर्व दर संबंधित वाहन, त्यावरील वाहनचालक व त्यासाठीचे इंधन यासह देणेत यावेत.

२) मक्तेदाराने दर भरताना जीएसटी सह व अनुज्ञेय असलेले सर्व करांसह भरावेत.

३) वरील दर देताना १२ टन टिपर ( तत्सम ) व ट्रॅक्टर-ट्रॉली इ. वाहनाचे दर वेगवेगळे देणेत यावे.

४) तसेच दर देताना प्रतिदिन २४ तास याप्रमाणे दर देण्यात यावे.

# इचलकरंजी महानगरपालिका

## वाहन विभाग

( खालीलप्रमाणे दर भरण्यात यावे )

| वाहन प्रकार | दैनंदिन २४ तास प्रमाणे ( वाहनचालक व इंधनासह ) |
|---|---|
| १) १२ टन टिपर ( तत्सम ) | |
| २) ट्रॅक्टर-ट्रॉली | |